# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


संदर्भ : रासेयो/२०२२–२३/७१८ दि. २६/०७/२०२२

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय : अमृत महोत्सव संकल्प युवा संमेलन रासेयो स्वयंसेवक सहभागाबाबत**

महोदय,

स्नेहालय संस्था मागील ३३ वर्षांपासून वंचितांच्या सेवेत समर्पित कार्य करीत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेने या वाटचालीत नेहमीच प्रेरणा, मदत दिली आहे. तरूणाईला सेवा कार्याची प्रेरणा देण्यासाठी युवानिर्माण, हा प्रकल्प सन २००० पासून स्नेहालय चालवते. या उपक्रमाच्या अंतर्गत दरवर्षी चार युवा शिबिरांचे आयोजन केले जाते. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त स्नेहालय संस्थेने अनेक उपक्रम राबविले आहेत.

या निमित्ताने तरूणाईला नवभारत निर्मितीची प्रेरणा आणि त्यासाठीचा प्रत्यक्ष कृती कार्यक्रम सुचवावा या उद्देशाने ३१ वे युवा शिबीर आयोजिले आहे. या शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्राचे राज्यपाल मा. भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते होणार आहे.

सदर शिबिराचे आयोजन अहमदनगर औद्योगिक वसाहती मधील स्नेहालय संकुल येथे दि. १२ ते १५ ऑगस्ट २०२२ दरम्यान आयोजित करण्यात आले असून सदर शिबिराकरिता आपल्या महाविद्यालयातील इच्छुक रासेयो स्वयंसेवक सहभागी होण्याकरिता पाठवावे. सदर स्वयंसेवकांचा प्रवास खर्च रासेयो नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा.

सदर शिबिराची संपूर्ण माहिती महाविद्यालयामार्फत संबधीत विद्यार्थांच्या पालकांना कळविण्यात यावी तसेच तशा आशयाचे हमीपत्र व संमतीपत्र पालकांकडून घेऊनच स्वयंसेवकास शिबिरात सहभागी होण्याकरिता पाठविण्यात यावे. कळावे, ही विंनती.

अधिक माहितीकरिता संपर्क क्रं. – ९०११०२६४७२, ७७७००२७५०५

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

स्नेहालय | Snehalaya

कार्यालय – सर्व्हे 239, एफ ब्लॉक, एम.आय.डी.सी., निंबळक,
ता.जि. अहमदनगर – 414 111 (महाराष्ट्र)
दुरध्वनी क्र. 0241-2778353 मो. नं. +91-9011020176, 77, 78, 80

Office : Survey No. 239, F-Block, M.I.D.C., Nimblak,
Tal & Dist. - Ahmednagar - 414 111 (M.S.) India.
• E-mail : info@snehalaya.org • Website : www.snehalaya.org

Estd. : 1989
Snehalaya
त म सो मा ज्यो ति र्ग म य ।
An ISO 9001-2008 Certified

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक/जावक क्र.: 256
दिनांक 21 JUL 2022
राष्ट्रीय सेवा योजना
शाखा-

मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
दिनांक 21 JUL 2022
टिपणी क्रमांक : 2566
दिनांक : 21/07/2022

संदर्भ:-स्नेह/४५४/२२ दिनांक:-२०/०७/२०२२

प्रति ,

डॉ. संजीव सोनवणे

प्र. कुलगुरू,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

Co-ordinator NSS
(1) let among all NSS having colleges
Liberal
21/7/22

विषय:- अमृत महोत्सव संकल्प युवा संमेलनाच्या उद्घाटन सोहळयास उपस्थितीची विनंती. तसेच या शिबिराकरीता आपल्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील राष्ट्रीय सेवा योजना / **NSS** मधील सहभागी तसेच **बाहेरील देशातील विद्यार्थ्यांना** सहभागी करून घेण्याची विनंती.

**श्रद्धेय सोनवणे सर,**

**सस्नेह नमस्कार !**

आपण जाणताच की, स्नेहालय संस्था मागील 33 वर्षांपासून वंचितांच्या सेवेत समर्पित कार्य करीत आहे. आपण या वाटचालीत नेहमीच प्रेरणा, मदत आणि मार्गदर्शन दिले आहे तरुणाईला सेवा कार्याची प्रेरणा देण्यासाठी युवानिर्माण, हा प्रकल्प वर्ष 2000 पासून स्नेहालय चालवते. या उपक्रमाच्या अंतर्गत दरवर्षी 4 युवा शिबिरांचे आयोजन केले जाते. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवास मागील वर्षी स्वातंत्र्यदिनी आरंभ झाला. यानिमित्ताने स्नेहालय संस्थेने वर्षभर सातत्याने अनेक उपक्रम राबवले. त्याचाच एक भाग म्हणून अहमदनगर ते नोखाली (बांगलादेश) ही 4280 किलोमीटर अंतराची सद्भावना सायकल यात्रा 150 तरुणांसह आम्ही काढली. येत्या 15 ऑगस्ट 2022 रोजी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी पर्वाचा समारोप होत आहे.

यानिमित्ताने तरुणाईला नवभारत निर्मितीची प्रेरणा आणि त्यासाठीचा प्रत्यक्ष कृती कार्यक्रम सुचवावा, या उद्देशाने मिळालेले 31 वे युवा शिबीर आयोजिले आहे. नियोजित स्वतंत्रता अमृत महोत्सव संकल्प युवा संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते होणार असून देशभारतील प्रत्यक्ष सेवा कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना संवादासाठी निमंत्रित केले आहे. पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रत्येक महाविद्यालयातील युनिट मधून प्रत्येकी दहा मुले

आणि मुली या शिबिरासाठी यावी , अशी आमची कल्पना आहे. यासाठी आपण पुणे विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागास तसेच सर्व महाविद्यालयांना निर्देश द्यावेत , ही नम्र विनंती आहे. बांगलादेश, नेपाळ, बाली इत्यादी ठिकाणचे काही विद्यार्थी-विद्यार्थिनी या शिबिरात सहभागी होत आहेत. शिबीर अहमदनगर औद्योगिक वसाहती मधील स्नेहालय संकुलात होणार आहे.शुक्रवार, दिनांक 12 ऑगस्ट 2022 रोजी, सकाळी 12 वाजता सर्व शिबीरार्थींचे कार्यक्रमाच्या ठिकाणी एकत्रीकरण होईल. सोमवार दिनांक 15 ऑगस्ट रोजी, दुपारी चार वाजता शिबिराचा समारोप होणार आहे. आपल्या सहयोगाच्या आणि प्रतिसादाच्या अपेक्षेसह धन्यवाद.

**-Contact Details-**

Email -yuvanirman@snehalaya.org

Cell No.+91 9011026472, +917770027505

Add.- Pratisad Kendra,Lendkar Mala,Balikashram Road, Pune-414001.

Online Registration details - Register online at- https://www.snehalaya.org/volunteer-youth-camp

आपला विश्वासू

डॉ.गिरीश कुलकर्णी

स्नेहालय परीवार